ePaper

**ऐतिहासिक भिडे वाडा अखेर जमीनदोस्त, कडेकोड बंदोबस्तात कारवाई!**



| वर्ष - 7 | अंक - 207 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 2 डिसेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- खराब कामगिरीचा बावुमाला फटका!
- 'सालार'चा ट्रेलर आऊट
- काँग्रेसला 'कामराज प्लॅन'चा विसर?
- शेतकरी एकित कमजोर ....

# लोणाव्यात 15 किलोमीटरचा थरारक ग्लास स्कायवॉक!

**।पुणे । महाईन्यूज ।**

**लोणावळा परिसर पर्यटनक्षेत्र विकासासाठी लोणावळ्यापासून १५ किलोमीटर अंतरावरील लायन्स व टायगर पॉइंट येथे स्काय वॉक विकसित करण्यात येणार आहे. त्यासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत (पीएमआरडीए) सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचे काम हाती घेतले आहे.**



संग्रहित छायाचित्र

मावळ तालुक्यातील वन विभागाच्या मौजे आतवन येथील राखीव वन गट नं. १६६ मधील आठ हेक्टर क्षेत्रात हा स्काय वॉक पीएमआरडीएमार्फत विकसित केला जाईल. त्यासाठी पर्यटन विकास विभागाकडून वित्त पुरवठा केला जाणार आहे. पालकमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली २१ सप्टेंबर २०२३ रोजी झालेल्या बैठकीत या प्रकल्पाबाबत चर्चा झाली होती. या प्रकल्पाला राज्य सरकारने तत्त्वतः मंजुरी दिली असून, त्यासाठी निधी उपलब्ध करून देऊ, असे पवार यांनी बैठकीत सांगितले होते. मावळ तालुक्यातील पर्यटन स्थळांचा विकास होत आहे. स्काय वॉक प्रकल्पामुळे लोणावळ्यातील पर्यटकांच्या संख्येत मोठी भर पडणार आहे. येथील अर्थकारणाला चालना मिळण्यास मदत होईल.

## ‘पीएमआरडीए’चा प्रकल्प अहवाल : राज्य सरकारची तत्वत: मंजुरी

### 2000 फूट खोल दरीवर काचेचा पूल...

»पुणे जिल्ह्यातील थंड हवेचे ठिकाण म्हणून लोणावळा परिसराची ओळख आहे. या पर्यटनस्थळाचा विकास करण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने स्काय वॉक उभारण्यात येईल. त्यामुळे दरीवर काचेच्या पुलावरून चालण्याचा अन हवेतून झेपावण्याचा आनंद घेता येणार आहे. स्काय वॉक प्रकल्पामुळे लोणावळ्यातील लायन्स आणि टायगर पॉईंटच रुपडे पालटणार आहे. दोन हजार फूट खोल दरीवर स्काय वॉक उभारून हे दोन्ही पॉईंट जोडले जाणार आहेत. जिप लाईनद्वारे हवेतून झेपावण्याचा थरार अनुभवता येणार आहे.

“ मुंबई, पुणे, पिंपरी- चिंचवड शहरासह राज्यातील व परराज्यातील पर्यटकांसाठी ‘स्काय वॉक’ हा प्रकल्प पर्यटनाचा थरार देणारा ठरेल. यात पर्यटकांच्या चालना सुरक्षेला अधिक प्राधान्य राहणार आहे. या प्रकल्पामुळे पुणे महानगर क्षेत्रातील पर्यटनाला मिळण्यास मदत होणार आहे.

**–रामदास जगताप,**
उपजिल्हाधिकारी तथा जनसंपर्क अधिकारी, पीएमआरडीए.

## पुणे-लोणावळा दरम्यान दुपारच्या वेळेत लोकल सुरु करा; खासदार बारणे

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पुणे-लोणावळा दरम्यान सकाळी साडे अकरा ते दुपारी अडीच वाजताच्या कालावधीत एकही लोकल गाडी नसल्याने प्रवासी, विद्यार्थी, चाकरमानी, नोकरदार, पर्यटक यांचे हाल होत आहेत. नागरिकांमध्ये याबाबत आंदोलनाची भावना वाढत आहे. त्यामुळे रेल्वे मंत्रालयाकडून पुणे-लोणावळा दरम्यान सकाळी साडे अकरा ते दुपारी अडीच वाजताच्या कालावधीत लोकल गाडी सुरु करण्याची मागणी मावळ लोकसभेचे खासदार श्रीरंग बारणे यांनी थेट संसदेत केली आहे. खासदार श्रीरंग बारणे यांनी म्हटले आहे की, कोरोना साथ सुरु होण्यापूर्वी पुणे-लोणावळा दरम्यान लोकल गाड्यांचे संचालन व्यवस्थित सुरु होते. कोरोना साथीच्या कालावधीत रेल्वेची सेवाच बंद करण्यात आली.

# बोऱ्हाडेवाडीत क्रीडांगणासाठी लोकप्रतिनिधी एकवटले!

## » उद्यानही विकसित करण्याची मागणी : आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन

**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**जाधववाडी आणि बोऱ्हाडेवाडी परिसरात नागरीकरण वाढले असून, स्थानिक नागरिकांसाठी पायाभूत सोयी-सुविधा सक्षम कराव्यात. तसेच, ज्येष्ठ नागरिकांसाठी उद्यान आणि मुलांसाठी खेळाचे मैदान विकसित करावे, अशी मागणी माजी महापौर राहुल जाधव यांनी केली आहे.**



याबद्दल मोशी, बोऱ्हाडेवाडी आणि जाधववाडी परिसरातील स्थानिक लोकप्रतिनिंच्या उपस्थितीमध्ये महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन देण्यात आले. यावेळी माजी महापौर राहुल जाधव, माजी नगरसेविका सारिका बोऱ्हाडे, अश्विनी जाधव, सामाजिक कार्यकर्ते नितीन बोऱ्हाडे, निलेश बोराटे, संतोष जाधव, निखिल बोऱ्हाडे, सोनम जांभुळकर आदी उपस्थित होते. आयुक्तांना दिलेल्या निवदनामध्ये म्हटले आहे की, जाधववाडी-बोऱ्हाडेवाडी येथे ‘एसटीपी’ची जागा ही खेळाच्या मैदानासाठी योग्य आहे. तसेच, परिसरात गार्डनसाठी एकही आरक्षण नाही. त्यामुळे खेळाचे मैदान व गार्डन हे १/ १३० या आरक्षणामध्ये गट नंबर ९० मध्ये विकसित करण्यात यावे.

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील समाविष्ट गाव जाधववाडी आणि बोऱ्हाडेवाडी या भागातील सोसायटीधारक आणि रहिवाशांची संख्या मोठी आहे.

स्थानिक नागरिकांच्या मागणीनुसार, या भागात उद्यान व खेळाचे मैदान विकसित करण्याची आवश्यकता आहे, अशी भावना स्थानिक लोकप्रतिनिधींची आहे.

### प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी...

»सदर गावांचा समावेश महापालिका हद्दीत होवून आता २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यामुळे विकास आराखड्याप्रमाणे पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करणे प्रशासनाची जबाबदारी असून, नागरिक लोकप्रतिनिधींकडे तगादा लावत आहेत. या बाबींचा विचार करुन जाधववाडी आणि बोऱ्हाडेवाडी या भागातील मोकळ्या जागेत उद्यान आणि खेळाचे मैदान विकसित करावे. त्यामुळे नागरिक आणि मुलांना सुविधा होईल. यासाठी प्रशासनाने सकारात्मक पुढाकार घ्यावा, अशी अशी मागणीही माजी महापौर राहुल जाधव यांनी केली आहे.

# एसटी प्रवाशांसाठी खुशखबर!

## » शिवाजीनगर स्थानकाला अखेर मुहूर्त मिळाला

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे शिवाजीनगर स्थानक वाकडेवाडीला हलवल्यानंतर चार वर्षांनी अखेर ते मूळ जागी उभारण्याचा निर्णय झाला आहे. स्थानकासोबत व्यावसायिक संकुल उभारण्याचा एसटी महामंडळाचा प्रस्ताव महामेट्रोने फेटाळला होता. यानंतर आता एसटीने व्यावसायिक संकुलाऐवजी केवळ स्थानक उभारण्याचा निर्णय घेतला आहे. या स्थानकाचा आराखडा या आठवड्यात अंतिम होणार आहे.**



शिवाजीनगर एसटी स्थानकाची चार एकर जागा होती. त्यातील सुमारे एक एकर जागा महामेट्रोला भुयारी मेट्रो स्थानक उभारण्यासाठी देण्यात आली. याबाबत मेट्रो आणि एसटीमध्ये करार झाला होता. शिवाजीनगर स्थानक पाडल्यानंतर तात्पुरत्या स्वरुपात ते २०१९ मध्ये वाकडेवाडी येथे दुग्धविकास विभागाच्या जागेत हलवण्यात आले. या जागेचे भाडे मेट्रो दुग्धविकास विभागाला देणार, असा निर्णय झाला होता. तीन वर्षांच्या कालावधीसाठी हे ठरले होते. आता त्याला चार वर्षे उलटली असून, शिवाजीनगर मेट्रो स्थानक सुरू झाले आहे. तरीही एसटी स्थानक अजूनही वाकडेवाडी येथेच आहे. एसटीच्या जागेपोटी शिवाजीनगर एसटी स्थानक महामेट्रो उभारणार आहे. महामेट्रोने तळमजल्याचे बांधकाम करून, त्यावर २१ फलाटांचे स्थानक आणि एसटीची कार्यालये असे बांधकाम करून देण्याची तयारी दर्शविली आहे. एसटीने या जागी व्यावसायिक संकुल बांधण्याचा आग्रह धरला होता.

याबाबत एसटीच्या उपसरव्यवस्थापकांनी महामेट्रोला ४ मे रोजी पत्र पाठविले होते. त्यात शिवाजीनगर येथे एसटीच्या जागेवर व्यावसायिक संकुल उभारण्याची व्यावसायिक व्यवहार्यता तपासण्याची मागणी करण्यात आली. त्यावर महामेट्रोने २२ ऑगस्टला एसटीला पत्र पाठवून व्यावसायिक संकुल उभारणे व्यवहार्य नसून, तिथे एसटी स्थानक उभारून देण्याचा पुनरुच्चार केला होता. आता यावर एसटीने केवळ स्थानक उभारण्याचा अंतिम निर्णय घेतला आहे, अशी माहिती एसटीतील सूत्रांनी दिली. शिवाजीनगर स्थानकात आधी एसटीची कार्यशाळा होती. ती एसटी स्थानकासोबत वाकडेवाडीला स्थलांतरित करण्यात आली. आता ही कार्यशाळा सांगवी येथे हलविण्याचा प्रस्ताव आहे. याच वेळी दुग्धविकास विभागाची अडीच एकर जागा कार्यशाळेसाठी मिळावी, अशी मागणी राज्य सरकारकडे करण्यात आली आहे. यावर राज्य सरकारकडून अद्याप निर्णय झालेला नाही. शिवाजीनगर एसटी स्थानकाची चार एकर जागा होती. त्यातील सुमारे एक एकर जागा महामेट्रोला भुयारी मेट्रो स्थानक उभारण्यासाठी देण्यात आली. याबाबत मेट्रो आणि एसटीमध्ये करार झाला होता. शिवाजीनगर स्थानक पाडल्यानंतर तात्पुरत्या स्वरुपात ते २०१९ मध्ये वाकडेवाडी येथे दुग्धविकास विभागाच्या जागेत हलवण्यात आले. या जागेचे भाडे मेट्रो दुग्धविकास विभागाला देणार, असा निर्णय झाला होता. तीन वर्षांच्या कालावधीसाठी हे ठरले होते. आता त्याला चार वर्षे उलटली असून, शिवाजीनगर मेट्रो स्थानक सुरू झाले आहे. तरीही एसटी स्थानक अजूनही वाकडेवाडी येथेच आहे.

> “ शिवाजीनगर येथील एसटी स्थानकाची ३६ गुंठे जागा महामेट्रोने घेतली. या जागेच्या बाजारमूल्याएवढे एसटी स्थानक मेट्रो बांधून देईल. एसटीकडून नवीन स्थानकाचा आराखडा मिळण्याची प्रतीक्षा आहे. एसटीकडून आराखडा मिळाल्यानंतर लगेचच स्थानकाचे काम सुरू होईल.
>
> **– अतुल गाडगीळ,** संचालक (कार्य), महामेट्रो

> “ शिवाजीनगर एसटी स्थानकाचा आराखडा तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. स्थानकाची रचना तळमजला आणि वर स्थानक अशी असेल. या आठवड्यात आराखडा मंजूर करून महामेट्रोकडे पाठविण्यात येईल.
>
> **– विद्या भिलारकर,** उपसरव्यवस्थापक, एसटी महामंडळ

# मिचौंग चक्रीवादळाचा तडाखा!

## » अनेक विमाने रद्द; रेल्वेसेवेलाही फटका

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**मिचौंग चक्रीवादळामुळे चेन्नईत अतिवृष्टी झाली असून, चेन्नई विमानतळही बंद करण्यात आले आहे. यामुळे पुण्याहून चेन्नईला जाणारी आणि तेथून येणारी १२ विमाने सोमवारी रद्द करण्यात आली. याचबरोबर चेन्नईला जाणाऱ्या आणि तेथून येणाऱ्या काही रेल्वे गाड्याही अंशत: रद्द करण्यात आल्या आहेत. चेन्नईतील विमानतळ बंद करण्यात आल्याने चेन्नईला जाणारी ६ विमाने आणि तेथून येणारी ६ विमाने रद्द करण्यात आल्याने प्रवाशांना मोठा फटका बसला.**

ही सर्व विमाने इंडिगो




कंपनीची होती. त्यात चेन्नई – पुणे, मंगळुरू – पुणे, हैदराबाद – पुणे, नागपूर – पुणे, पुणे – बंगळुरू, पुणे – चेन्नई, पुणे – नागपूर आणि पुणे -मंगळुरू या विमानांचा समावेश आहे. मिचौंग चक्रीवादळामुळे चेन्नईत मुसळधार पाऊस झाला.

त्यामुळे चेन्नई विमानतळ मंगळवारी सकाळपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आलाआहे. पावसामुळे चेन्नईतील विमान व रेल्वे सेवा विस्कळीत झाली आहे. विमाने रद्द होण्यामुळे हजारो प्रवाशांच्या प्रवासाच्या योजनेवर पाणी फिरले. पुणे विमानतळ प्रशासनाकडून चेन्नईतील परिस्थितीची माहिती घेतली जात आहे. आगामी स्थितीनुसार आणखी विमाने रद्द केली जाण्याची शक्यता आहे. मध्य रेल्वेने मुंबई -चेन्नई सेंट्रल ही गाडी अरक्कोनमपर्यंत चालविण्याचे जाहीर केले आहे. ती पुढे चेन्नईपर्यंत जाणार नाही. याचबरोबर चेन्नई सेंट्रल – मुंबई ही गाडी चेन्नईऐवजी अरक्कोनम येथून सुटणार आहे. हे बदल तात्पुरत्या स्वरूपात करण्यात आले असून, स्थिती सुधारल्यानंतर नेहमीप्रमाणे या गाड्या धावतील, अशी माहिती रेल्वे प्रशासनाने दिली आहे.मिचौंग चक्रीवादळामुळे चेन्नईत अतिवृष्टी झाली असून, चेन्नई विमानतळही बंद करण्यात आले आहे. यामुळे पुण्याहून चेन्नईला जाणारी आणि तेथून येणारी १२ विमाने सोमवारी रद्द करण्यात आली. याचबरोबर चेन्नईला जाणाऱ्या आणि तेथून येणाऱ्या काही रेल्वे गाड्याही अंशत: रद्द करण्यात आल्या आहेत.

# पूर्व विदर्भात जोरदार पावसाचा अंदाज!

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

मिचौंग चक्रीवादळाचा परिणाम म्हणून पूर्व विदर्भात मंगळवार आणि बुधवारी वादळी वारे, मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस होण्याचा अंदाज आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मिचौंगचे या चक्रीवादळाचे सोमवारी सकाळी साडेआठ वाजता तीव्र चक्रीवादळात रुपांतर झाले आहे. चक्रीवादळ सकाळी साडेसाठ वाजता चेन्नईपासून ईशान्य दिशेला ९० आणि नेल्लोरपासून आग्नेय दिशेला १५० किमीवर अंतरावर होते. तीव्र चक्रीवादळात रुपांतर झाल्यानंतर ते ८५ ते १०५ किमी प्रती तास वेगाने किनाऱ्याकडे झेपावत आहे. तीव्र चक्रीवादळ उद्या दुपारी नेल्लोरच्या जवळ बापटला येथे धडकण्याची शक्यता आहे. या चक्रीवादळाचा परिणाम म्हणून राज्यात आर्द्रतेचे प्रमाण वाढणार आहे. प्रामुख्याने विदर्भ आणि मराठवाड्यात ढगाळ वातावरण निर्माण होऊन किमान तापमानात वाढ होईल. तसेच पुढील चार दिवस राज्यात तुरळक ठिकाणी हलक्या पावसाचा अंदाज आहे. मंगळवार आणि बुधवारी पूर्व विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, यवतमाळ आणि गोंदियात वादळी वारे, मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस होण्याचा अंदाज आहे. गुरुवारी, सात डिसेंबरनंतर मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात हवामान कोरडे होण्यास सुरुवात होईल. या काळात कोकण किनारपट्टीवरही हवामान कोरडे राहून किमान तापमानात दोन ते तीन अंश सेल्सिअसने घट होईल

# पिंपरी-चिंचवडकरांनी अनुवभली
# विकसित भारत संकल्प यात्रा!

## अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप: योजनांचा लाभ शहरवासीयांनी घ्यावा!

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारत सरकारच्या महत्वाकांशी योजनांचे लाभ लक्षित लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी केंद्र शासनाच्या विकसित भारत संकल्प यात्रेचा शुभारंभ पिंपरी चिंचवड शहरात २८ नोव्हेंबर रोजी करण्यात आला होता. आज सदर यात्रेचे वाहन पवनानगर येथील बॅडमिंटन हॉल आणि केशवनगर येथील मोरया ग्राऊंड येथे आले असता स्थानिक नागरिकांनी वाहनाला भेट देऊन शासनांच्या विविध योजनांचा लाभ घेतला.**



पिंपरी: यावेळी अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, माजी नगरसदस्य सुरेश भोईर, मोरेश्वर शेडगे, माजी नगरसदस्या अश्विनी चिंचवडे, क्षेत्रीय अधिकारी अमित पंडित तसेच सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी विकसित भारत संकल्प यात्रेच्या विविध कक्षांना भेट देऊन तेथील योजनांची माहिती घेतली. नागरिकांना कल्याणकारी योजनांचा लाभ... आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या सुचनेनुसार पिंपरी चिंचवड शहरातील ६४ ठिकाणी हे वाहन भेट देणार आहे.

प्रत्येक वॉर्डामध्ये २ ठिकाणी या वाहनासह नागरिकांना मार्गदर्शन करणारे विविध कक्ष केंद्र शासनाच्या विविध योजनांचे लाभ देण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

तरी या वाहनामार्फत पुरविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ शहरवासीयांनी घ्यावा, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांनी केले आहे.

### नागरिकांना कल्याणकारी योजनांचा लाभ...

विकसित भारत संकल्प यात्रा उपक्रमाद्वारे आधार केंद्र, आत्मनिर्भर स्वनिधी योजना, आयुष्मान कार्ड, महिला व बाल-कल्याण योजना, मागासवर्गीय कल्याणकारी योजना, दिव्यांग कल्याणकारी योजना तसेच इतर कल्याणकारी योजनांचा लाभ नागरिकांना देण्यात येणार आहे.

# 'ग्रुपो अँन्टोलीन' कामगारांना 'विंटर गिफ्ट'!

## तब्बल 18 हजार रुपयांची मिळाली वेतनवाढ : स्वाभीमानी श्रमिक कामगार संघटनेचा करार

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चाकण औद्योगिक वसाहातीमधील खराबवाडी येथील ग्रुपो अन्टोलीन प्रा. लि. कंपनीतील कमागारांना तब्बल १८ हजार रुपयांची वेतनवाढ मिळाली आहे. चाकण औद्योगिक पट्ट्यातील ही सर्वाधिक वेतनवाढ असून, स्वाभिमानी श्रमिक कामगार संघटना आणि कंपनी व्यवस्थापन यांच्यात वेतनवाढ करार झाला आहे. .**



पहिल्या वेतनवाढ करार संघटनेचे प्रमुख सल्लागार आमदार महेश लांडगे, प्रमुख सल्लागार रोहिदास गाडे, संघटनेचे अध्यक्ष जीवन येळवंडे, कंपनीचे डायरेक्टर बिश्व रंजन मोहंती यांच्या उपस्थित वेतनवाढ करार करण्यात आला.

करारावरती संघटनेच्या वतीने प्रमुख सल्लागार आमदार महेश लांडगे, प्रमुख सल्लागार रोहिदास गाडे, अध्यक्ष जीवन येळवंडे, सरचिटणीस कृष्णा रोहोकले, चिटणीस रघुनाथ मोरे, खजिनदार अमृत चौधरी, युनिट अध्यक्ष संजय पाटील, उपाध्यक्ष रवींद्र तेजम, सरचिटणीस महेंद्र कदम, खजिनदार भगवान शिंगोटे, सहचिटणीस शंकर मांडेकर, सदस्य, पंकज क्षीरसागर, ज्ञानेश्वर पाटील, व्यवस्थापनाच्या वतीने कंपनीचे डायरेक्ट बिश्व रंजन मोहंती, प्लांट हेड वेंकट पुगाल, एच.आर इंडिया हेड - सॅम्युअल, एच.आर. मॅनेजर दीपक खोत, एच.आर. असिस्टंस - नितीन थोरबोले, प्रोडक्शन हेड - हिमांशू सिसोदिया, क्यालिटी हेड - सूर्यनारायण यांनी सह्या केल्या.\

यावेळी माथाडी कामगार नेते किसनराव बावकर, उद्योजक महादेव येळवंडे, महिंद्रा लॉजिस्टिक माजी युनिट अध्यक्ष प्रशांत पाडेकर, दत्तात्रय गवारे, रविंद्र भालेराव उपस्थित होते. कामगारानी डीजेच्या तालावर नाचून, पेढे वाटून फटाक्यांची अतिषबाजी करून आनंद व्यक्त केला.

### करारामध्ये कामगारांसाठी मिळालेले लाभ...

एकूण पगारवाढ :- १८००० /-( आठरा हजार रुपये), कराराचा कालावधी:- ०१/०४/२०२२ ते ३१/०३/२०२५ या तीन वर्षांचा राहील. मेडिक्लेम पॉलीसी:- कुटुंबासाठी २२५००० /- रुपयांची पॉलिसी राहणार असून संपूर्ण खर्च कंपनी करणार या पॉलिसी मध्ये स्वतः, पत्नी, मुले आणि आई-वडील यांचा समावेश करण्यात येणार आहे. बफर १० लाख असेल. मृत्यू साहाय्य योजना: २५०००००/- (पंचवीस लाख) रुपये पॉलिसी कंपनीकडून कायदेशीर वारसास मिळणार आहे. ग्रुप एक्सीडेंट पॉलिसी, पगारी सुट्या, मतदानाची सुट्टी, दिवाळी बोनस, मासिक हजेरी बक्षीस, वैयक्तिक कर्ज सुविधा/ उचल, कॅन्टीन सुविधा, बस सुविधा, पेट्रोल भत्ता, पगाराचा फरक अशा विविध बाबी करारात नमूद करण्यात आल्या आहेत.

# नौदलाने यशस्वी केले 'ऑपरेशन जॅकपॉट'




**मार्च, १९७१मधे पाकिस्तानी सैन्य पूर्व पाकिस्तानवर तुटून पडले होते. २५ मार्च, १९७१ला लेफ्टनन्ट जनरल टिकाखान यांनी तिथे 'ऑपरेशन सर्च लाईट' सुरू करून दोन दिवसांत जवळपास तीन लाख बंगाली विद्वान, विचारवंत, खेळाडू, कलाकार, लेखक, उद्योगपती, विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, पोलीस, सैनिक इत्यादींचा बळी घेतला होता.**

त्यावेळी फ्रान्समधील तुलों नौदल तळावर सामरिक अभ्यास करत असलेल्या, 'पीएनएस मांगरो' या पाकिस्तानी पाणबुडीवरील आठ बंगाली नाविकांनी पाणबुडी सोडून बांगलादेशच्या स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होण्याचा निर्णय घेतला. फ्रान्समधून पळून आलेले हे बंगाली नाविक ३१ मार्च, १९७१ला स्पेनची राजधानी माद्रिदच्या भारतीय दूतावासात दाखल झाले. दूतावास प्रमुख, भारतीय परराष्ट्र सेवाधिकारी, सरदार गुरदीप सिंग बेदी यांनी त्यांचे पासपोर्ट तपासून त्याची माहिती दिल्लीला कळवल्यावर भारत सरकारच्या अधिकाऱ्यांनी त्यांना तात्काळ दिल्लीला पाठवण्याचे निर्देश दिले. आठही जणांना हिंदू नावे देत, ते भारतीय असल्याचे भासवून माद्रीदहून बार्सिलोनामार्गे रोमला पाठवण्यात आल, मात्र ते भारतात जात असल्याची माहिती माध्यमांना आणि रोममधील पाकिस्तानी दूतावासालाही मिळाली. पाकिस्तानी दूतावासातील अधिकारी या नाविकांची मनधरणी करण्यासाठी विमानतळावर पोहोचले. मात्र, या नाविकांचे नेते अब्दुल वहीद चौधरी यांनी आपण बांगलादेश स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होणार असल्याचे स्पष्ट केल. हे आठही नौसैनिक दिल्लीत पोहोचताच त्यांना 'रॉ'च्या (रिसर्च अँड ॲनालिसिस विंग) एका सेफ हाऊसमध्ये ठेवण्यात आले . भारत सरकारने पश्चिम पाकिस्तानातून पूर्व पाकिस्तानकडे हवाई मार्गाने जाण्यावर बंदी घातली होती. त्यामुळे समुद्रमार्गे श्रीलंकेला वळसा घालू जाणे हा एकच पर्याय पाकिस्तानकडे होता. तोही निष्प्रभ ठरावा म्हणून रॉ, भारतीय नौसेना आणि मुक्ती वाहिनीने एप्रिल, १९७१पासूनच एका धाडसी सागरी हल्ल्याची योजना आखण्यास सुरुवात केली होती. मी स्पेशल फ्रंटियर फोर्समध्ये सेवा देत होतो. रॉ प्रमुख आर. एन. काव यांच्या अधिपत्याखाली स्पेशल फ्रंटियर फोर्स, भारतीय नौसेना व वायुसेना आणि रॉचे कमांडो पूर्व पाकिस्तानात दाखल झाले होते. पाकिस्तानी पोलीस, ईस्ट बंगाल रायफल्स आणि पूर्व बंगालस्थित पाक वायुसेना व नौसेनेमधील बंगाली सैनिक भारतात शरण येऊ लागले होते. त्यांच्यातूनच मुक्ती वाहिनीच्या उभारणीची प्रक्रियाही सुरू झाली होती. फ्रान्समधून आलेल्या या नाविकांचे काय करायचे हा प्रश्न आर. एन. काव आणि भारतीय नौसेनेचे तत्कालीन डायरेक्टर नेव्हल इंटेलिजन्स कॅप्टन एम. के. मिकी रॉय यांना पडला होता. नाविकांशी चर्चा केल्यानंतर त्यांनी ईस्ट पाकिस्तानात तैनात पाकिस्तानी युद्धनौका बुडविण्याची योजना आखली. ह होते, 'ऑपरेशन जॅकपॉट'! आम्ही प्रशिक्षण देत असलेल्या मुक्ती वाहिनीलाही यात सहभागी करून घेण्यात आले. नेव्हल कमांडर एम. एन. आर. सामंत यांच्यावर या मोहिमेची जबाबदारी सोपवण्यात आली. भारत आणि पूर्व पाकिस्तानच्या सीमेजवळ, जिथे प्लासीचे युद्ध झाल तिथे, भागीरथी नदीच्या काठी, मुक्ती वाहिनीच्या नौदल जवानांना कमांडोंना प्रशिक्षण देण्यासाठी कॅम्प उभारण्यात आला. काही दिवस मी सुद्धा या कॅम्पमधे कार्यरत होतो. याचे सांकेतिक नाव (कोडनेम) 'कॅम्प टू प्लासी: सी२पी' होते. भारतीय नौसेनेचे कमांडर डेव्हिड फेलिक्स आणि कॅप्टन मिहीर रॉय यांनी १७ नौदल आणि १३ लष्करी कमांडोंद्वारे १६० बांगलादेशी सागरी कमांडोंना छद्म युद्धाचे प्रशिक्षण दिले. या कॅम्पमधील दिवस, बांगला देशाच्या 'आमार शोनार बांगला' या राष्ट्रगीतानंतर, त्यांच्या हिरव्या नारंगी रंगाच्या झेंड्याला सलामी देऊन सुरू होत असे. वीज, पाण्याची वानवा होती, रात्री कंदील लागत असे, पाणी हँडपंपवरून आणले जात असे, राहायला नऊ तंबू होते. आम्ही पहाटे पाच वाजता उठायचो. पीटीनंतर त्यांना ऊसाच्या शेतात अनवाणी धावायला न्यायचो. दुपारी जेवून दीड तास आराम केल्यानंतर आम्ही या लोकांना, माणूसभर उंचीच्या पुतळ्यांवर गोळ्या घालण्याच प्रशिक्षण द्यायचो. सूर्यास्तापर्यंत सर्व जण थकलेले असत तरी, रात्री त्यांना दूरपर्यंत पोहण्याचे (लॉन्ग डिस्टंट स्विमिंग) प्रशिक्षण दिले जात असे. वजन उचलून पोहण्याचा सराव व्हावा, यासाठी त्यांच्या पोटा-पाठीवर दोन-दोन विटा बांधल्या जात.



## संपादकीय »

### राम आम्हाला देतो

***विजयाचे पितृत्व घेण्यास अनेक इच्छुक असतात; पण पराजय अनाथ आणि अनौरस असतो हे सत्य पाच राज्यांतील निवडणुकांचे निकाल पुसून टाकतात.***

विजयाचे पितृत्व घेण्यास अनेक इच्छुक असतात; पण पराजय अनाथ आणि अनौरस असतो हे सत्य पाच राज्यांतील निवडणुकांचे निकाल पुसून टाकतात. या पाचपैकी मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड आणि तेलंगणा या चार राज्यांतील मतमोजणी रविवारी झाली. आज, सोमवारी मिझोरामचा निकाल लागेल. या चार राज्यांच्या तुलनेत तो तितका महत्त्वाचा म्हणता येणार नाही. या चारपैकी तीन राज्ये भाजपने सहजी जिंकली आणि तेलंगणाने काँग्रेसला हात दिला. त्या दक्षिणी राज्यात भाजप नावापुरता होता. त्यामुळे तेथे लढाई दोन वेळचे सत्ताधीश, तेलंगणा राष्ट्रीय समितीचे के. चंद्रशेखर राव आणि काँग्रेस यांच्यातच होती. या राव यांस काँग्रेसने धूळ चारली. गेले वर्षभर या राव यांचा रथ चांगलाच उडत होता आणि त्यांस राष्ट्रीय नेतृत्वाची स्वप्ने पडू लागली होती. ती मातीमोल झाली ही आनंददायक बाब.

**निवडणुकांच्या हंगामात निवडणूक आयोगासारख्या स्वायत्त संस्थांकडून सर्वांना समान न्यायाची अपेक्षा असते. पण तेलंगणात जो काही प्रकार झाला त्यावरून निवडणूक आयोग कोणाच्या दबावाखाली काम करतो की काय, अशी शंका येण्यास जागा निर्माण होते. तेलंगणात येत्या गुरुवारी मतदान होत आहे. मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांच्यासमोर काँग्रेसने आव्हान उभे केले आहे. सत्ताधारी पक्षासमोर आव्हान उभे राहते.**

## घटनात्मक' निवडणूक आयोग, की खातेच?

तेलंगणातील शेतकऱ्यांना शेतीच्या हंगामापूर्वी खते, अवजारे खरेदीसाठी मुख्यमंत्री चंद्रशेखर राव यांनी 'रयतु बंधू' ही योजना सुरू केली. या योजनेंतर्गत खरीप आणि रब्बी या दोन्ही हंगामांपूर्वी दर एकरासाठी पाच हजार रु. शेतकऱ्यांच्या खात्यात थेट जमा होतात. रब्बी हंगाम सुरू होत असल्याने शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा करण्याची सत्ताधारी भारत राष्ट्र समितीला घाई झाली. तेलंगणा सरकारने शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे हस्तांतरित करण्यासाठी १८ नोव्हेंबरला परवानगी मागितली. निवडणूक आयोगाने २४ नोव्हेंबरला काही अटींसह शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे हस्तांतरित करण्यास परवानगी दिली. 'पैसे हस्तांतरित केले तरी त्याचा राजकीय फायदा उठवू नये,' अशी मुख्य अट होती. शेतकरी किंवा कोणत्याही समाजघटकांच्या खात्यात निवडणूक हंगामात पैसे जमा झाल्यावर सत्ताधारी त्याचा राजकीय लाभ घेणार हे ओघानेच आले. समाजमाध्यमांच्या



काळात जाहीरपणे प्रचार केला नाही तरी लोकांच्या मोबाइलवर योग्य तो संदेश पोहोचतोच. प्रचारात तेलंगणाचे वित्तमंत्री आणि मुख्यमंत्र्यांचे भाचे हरीश राव यांनी जाहीर सभेत पैसे हस्तांतरित केल्याचा मुद्दा मांडलाच. शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा करण्यास आधी परवानगी द्यायची आणि अवघ्या ७२ तासांत ती मागे घ्यायची या साऱ्याचा सत्ताधारी भारत राष्ट्र समितीला निश्चितच राजकीय लाभ होणार आहे. कारण दोन दिवसांत अनेक शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा झाले असणार. १८ तारखेला तेलंगणा सरकारचे पत्र प्राप्त झाले तेव्हाच निवडणूक आयोगाला ३० तारखेपर्यंत थांबण्याचा सल्ला देता आला असता. पण यामागे केंद्रातील सत्ताधारी भाजपने सत्ताधारी भारत राष्ट्र समितीला अप्रत्यक्षपणे मदत केल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. आणखी एका राज्यात काँग्रेस सत्तेत येऊ नये, ही भाजपची खेळी असणारच. पाच राज्यांच्या सध्या सुरू असलेल्या निवडणूक हंगामातच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील ८० कोटी गरीब जनतेला मोफत धान्यपुरवठा करण्याच्या योजनेला आणखी पाच वर्षे मुदतवाढ देण्याची घोषणा छत्तीसगडमधील प्रचारसभेत केली होती. मतदारांवर सरळसरळ प्रभाव पाडणारी ही घोषणा होती. त्याआधी पंतप्रधान किसान योजनेतील निधी विलंबाने हस्तांतरित करण्यामागे ऐन निवडणूक हंगामातच हा निधी देण्याचा हिशेब असल्याचा आरोप काँग्रेसने केला होता. मध्य प्रदेशातील प्रचारात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मतदारांना अयोध्येतील राम मंदिराचे मोफत दर्शन घडविण्याचे आश्वासन दिले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# शेतकरी एकित कमजोर ; कारखानदार शिरजोर!

## संघटनेनच्या आंदोलनाकडे शेतकऱ्यांची पाठ

। सांगली ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**ऊस दर वाढीसाठी शेतकरी संघटना रस्त्यावर उतरून आक्रमक आंदोलन करताना दिसत आहे. सांगली जिल्ह्यात मात्र गावागावात असणाऱ्या ऊस उत्पादकांचा याला विशेष पाठिंबा दिसत नाही. पाठिंबा नसल्याने या आंदोलनाची धार बोथट झाली आहे. परिणामी कारखानदार ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर शिरजोर होऊन ऊस दरात विशेष वाढ देताना दिसत नसल्याचे चित्र सांगली जिल्ह्यात आहे.**



शेतकरी आंदोलनात सक्रिय नाहीत हे लक्षात येताच कारखानदारांनी ऊस दराचा काटा मारायला सुरुवात केली आहे. ३ हजार ५०० दर देण्याची मागणी असताना तो दर ३ हजार १५० पर्यंत खाली आला आहे. केवळ संघटित नसल्याने हे नुकसान होत आहे. शेतकरी पक्ष, गट, तट विसरून एक झाला. तेव्हापासून जेवढा साखरेला दर त्या तुलनेत उसाला दर मिळू लागला. परंतु मागील चार-पाच वर्षांपासून साखरेची किंमत वाढत राहिली, पण ऊस दर २ हजार ९०० ते ३ हजार पर्यंत स्थिरावला.

एका बाजूला शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते पदरमोड करून आपल्या घरादाराचा विचार न करता उसाला भाव मिळावा म्हणून रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहेत. त्यांच्यावर गुन्हे दाखल होत आहेत. पोलिस अटक करत आहेत. तरी ते शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी लढत आहेत. त्यांच्या पाठिशी ताकदीने उभा राहण्या ऐवजी शेतकरी मात्र हातावर हात ठेवून बसून आहे. आंदोलनात सहभागी होत नसल्याने कारखाने मनमानी दर देत आहेत. शेतकऱ्यांना ऊस दर घेण्यापेक्षा ऊस लवकर जावा याकडे त्यांचा कल अधिक असतो. राजकीय सभांना उपस्थित राहण्यास शेतकऱ्यांना वेळ असतो पण स्वतःच्या हक्कासाठी लढण्यास त्यांना वेळ नाही अशी स्थिती आहे. शेतकरी अभ्यास गटाने मांडलेल्या हिशोबानुसार आज किरकोळ बाजारात साखर ४२ ते ४५ रुपये किलो आहे. शेतकरी संघटनांच्या मतानुसार कारखाने ३ हजार ८०० ते ३ हजार ९०० रुपये दराने साखर विकत आहेत. कराड तालुक्यातील साखरेचा उतारा हा साडेबारा आहे. म्हणजे १ टन उसापासून कारखाने ४ हजार ७५० रुपये मिळवत आहेत. उपपदार्थांपासून मिळणारे उत्पन्न १ हजार ते १ हजार २०० रुपये प्रति टन आहे. १ टन उसापासून मिळणारे उत्पन्न ५८०० रुपये आहे. यातून तोडणी, वाहतूक, पगार, कर्जाचे व्याज, प्रशासकीय खर्च असे सर्व खर्च २००० रुपये वजा केले तरी ३ हजार ८०० रुपये शिल्लक राहतात.

### नेत्यांची भीती...

गावागावातील शेतकरी कोणत्या ना कोणत्या पक्षाशी जोडलेला असतो. त्यामुळे ऊस दर वाढीच्या आंदोलनात शेतकरी संघटना सोबत जायला हे शेतकरी घाबरत असल्याचे चित्र आहे. संघटनेच्या आंदोलनात सहभागी झालो तर आपला नेता काय म्हणेल ही भीती शेतकऱ्यांना सतावत आहे. त्यामुळे शेतकरी संघटनेच्या आंदोलनांना यश मिळत नाही.

# २०२४ साली अजित पवार मुख्यमंत्री?

## आमदार अमोल मिटकरी यांचे विधान

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राजस्थान, छत्तीसगढ आणि मध्य प्रदेशातील दणदणीत विजयानंतर भाजपाचा आत्मविश्वास वाढला आहे. पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत निर्विवाद यश मिळवू, असा विश्वास भाजपा नेते आणि कार्यकर्त्यांमध्ये आहे. अशातच भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलेलं विधान चर्चेत आलं आहे. महाराष्ट्रात पुढील मुख्यमंत्री म्हणून वानखेडे स्टेडियमवर कोण शपथ घेणार? असा प्रश्न विचारत चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाजपा कार्यकर्त्यांकडून देवेंद्र फडणवीस यांचं नाव वदवून घेतलं आहे. यावर अजित पवार गटातील आमदार अमोल मिटकरी यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.**



### लोकशाहीत भावनेला अर्थ नसतो

एका कार्यक्रमास भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळ पाहुणे म्हणून उपस्थित होते. तेव्हा बोलताना बावनकुळेंनी म्हटलं, "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भाजपा विजयाचा एक-एक टप्पा पार करत आहे. तीन राज्यांत मिळालेल्या घवघवीत यशानं लोकसभेला आपण हॅट्रिक करणार, यावर शिक्कामोर्तब झालं आहे." यावर बोलताना अमोल मिटकरी म्हणाले, "विधानसभा निवडणुकीत भाजपाला स्पष्ट बहुमत मिळालं आहे. त्यामुळे बावनकुळेंचा आत्मविश्वास वाढणं साहजिक आहे. पण, २०२४ साली अजित पवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असतील, अशी आमची भावना आहे. मात्र, लोकशाहीत भावनेला अर्थ नसतो.

भंडाऱ्यातील लाखनी येथे एका कार्यक्रमास भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळ पाहुणे म्हणून उपस्थित होते. तेव्हा बोलताना बावनकुळेंनी म्हटलं, "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भाजपा विजयाचा एक-एक टप्पा पार करत आहे. तीन राज्यांत मिळालेल्या घवघवीत यशानं लोकसभेला आपण हॅट्रिक करणार, यावर शिक्कामोर्तब झालं आहे." आपल्याकडेही (महाराष्ट्रात) वेगळी परिस्थिती नसेल," असं सांगताना पुढील मुख्यमंत्री म्हणून वानखेडे स्टेडियवर कोण शपथ घेणार? असा प्रश्न विचारत बावनकुळेंनी भाजपा कार्यकर्त्यांकडून फडणवीसांचं नाव वदवून घेतलं. यावर बोलताना अमोल मिटकरी म्हणाले, "विधानसभा निवडणुकीत भाजपाला स्पष्ट बहुमत मिळालं आहे. त्यामुळे बावनकुळेंचा आत्मविश्वास वाढणं साहजिक आहे. पण, २०२४ साली अजित पवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असतील, अशी आमची भावना आहे. मात्र, लोकशाहीत भावनेला अर्थ नसतो. ज्याचे जास्त आमदार, त्या पक्षाचा मुख्यमंत्रीपदावर दावा असतो." जास्तीत जास्त निवडून आणायचे आणि जसा बावनकुळेंचा संकल्प आहे, तसा आमचाही संकल्प आहे, की झोकून देऊन काम करू. २०२४ आणि २०२९ साली अजित पवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असतील. तेही वानखेडे स्टेडियमवर शपथ घेतील," असा विश्वास अमोल मिटकरींनी व्यक्त केला आहे.

# फडणवीस चाणक्य आहेत या अंधश्रद्धा!

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

देवेंद्र फडणवीस चाणक्य आहेत या अंधश्रद्धा आहेत अशी टीका सुषमा अंधारे यांनी केली आहे. भाजपाचे अनुसूचित जमाती मोर्चा ठाणे जिल्हाध्यक्ष महादेव घाटाळ यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केल्या नंतर रविवारी संध्याकाळी भिवंडी ग्रामीण मध्ये उपनेत्या सुषमा अंधारे यांच्या प्रमुख उपस्थितीत शेकडो कार्यकर्त्यांनी पक्ष प्रवेश केला. त्यावेळी सुषमा अंधारे यांनी भाजपा सह शिवसेना शिंदे गटावर सडकून टीका केली. "लोक उगाच म्हणतात देवेंद्र फडणवीस चाणक्य आहेत. मात्र ही सगळी अंधश्रद्धा आहे. चाणक्य माणसं घडवणारा आहे. आपण देवेंद्र फडणवीसांना विचारलं की तुम्ही कुणाला घडवलं तर उत्तर मिळतं कुणालाच नाही. देवेंद्र फडणवीस यांनी माणसं घडवली नाहीत.देवेंद्र फडणवीस यांनी माणसं घडवली नाहीत. त्यांनी इकडून तिकडून माणसं भाड्याने गोळा केली आहेत. देवेंद्र फडणवीस जुगाड करण्यात पटाईत आहेत माणसं घडवण्यात नाहीत. देवेंद्र फडणवीस यांनी माणसं घडवली नाहीत तर त्यांनी संपवली. त्यांनी विनोद तावडेंना संपवलं, पंकजा मुंडेंना साईडलाईन केलं, एकनाथ खडसेंना त्रास दिला असाही आरोप सुषमा अंधारेंनी केला. जे बाहेरुन घेतले होते अशांबरोबर त्यांनी काय न्याय केला? विनायक मेटेंना काय न्याय मिळाला? राजू शेट्टींबरोबर सदाभाऊ खोत का दिसत नाहीत? याचा विचार करा" असंही सुषमा अंधारे म्हणाल्या. मला कुणीतरी सांगितलं की भिवंडी कपिल पाटील यांचा मतदारसंघ आहे. पण हीदेखील अंधश्रद्धाच आहे. कारण असा मतदारसंघ वगैरे कुणाचा नसतो. कपिल पाटील यांच्या तुलनेत तुम्हीच जास्त लाइट बिल भरता, पाणी पट्टी भरता, घर पट्टी भरता त्यामुळे हा तुमचा मतदार संघ आहे. एखाद्याचा मतदारसंघ असं काही नसतं तो तिथे राहणाऱ्यांचा मतदारसंघ असतो असंही सुषमा अंधारे म्हणाल्या.

# काँग्रेसला 'कामराज प्लॅन'चा विसर?

## चारपैकी तीन राज्यांच्या निवडणुकीत काँग्रेसचा पराभव

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**तेलंगणा (TELANGANA) सोडलं तर राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमध्ये काँग्रेसला सपाटून मार खावा लागला आहे. मध्य प्रदेशमध्ये आशा असताना आणि राजस्थानमध्ये (RAJASTHAN) सत्ता असतानाही काँग्रेसला अपेक्षेपेक्षा कितीतरी कमी जागा मिळाल्या. या निवडणुकीच्या निमित्ताने हिमाचल प्रदेश सोडलं तर हिंदी बेल्टमधून काँग्रेस बाहेर पडलं. त्यामुळे लोकांमध्ये राहुल गांधींच्या 'भारत जोडो' पदयात्रेच्या वेळी निर्माण झालेली सहानुभूती आणि कार्यकर्त्यांचा उत्साह हा तेवढ्यापुरताच होता का? की ही निर्माण झालेली सहानुभूती ज्येष्ठ नेत्यांच्या सत्तेच्या हव्यासापोटी काँग्रेसला (CONGRESS) गमवावी लागली हे काही स्पष्ट होत नाही.**



अनेक पराभवांच्या अनुभवातून काँग्रेस काहीच शिकत नाही की काँग्रेसला त्याच्याच 'कामराज प्लॅन'चा (KAMARAJ PLAN) विसर पडला हेदेखील समजत नाही. तेलंगणाच्या नेतृत्वाची कमान ही रेवंत रेड्डी (REVANTH REDDY) या आक्रमक नेत्याकडे असल्याने त्यांनी बीआरएसला जशास तसं उत्तर दिलं आणि सत्ता खेचून आणली. त्या उलट राजस्थानमध्ये अशोक गेहलोत (ASHOK GEHLOT) आणि सचिन पायलट यांच्यातील राजकारण जनतेने पाहिलं. तसेच ज्योतिरादित्य शिंदे (JYOTIRADITYA SCINDIA) काँग्रेस सोडून गेल्यानंतर कमलनाथ (KAMAL NATH) यांच्याकडे नेतृत्व आलं खरं, पण मध्य प्रदेशच्या जनतेच्या मात्र ते पचनी पडलं नसल्याचं स्पष्ट झालं. साठच्या दशकामध्ये काँग्रेसची होणारी वाताहत थांबवण्याचं काम एका माणसाने केलं आणि तो म्हणजे के कामराज (K. KAMARAJ). तामिळनाडूचे मुख्यमंत्री असलेल्या या व्यक्तीने त्यावेळी आपला राजीमाना दिला आणि पक्ष संघटनेमध्ये काम सुरू केलं. त्यांनी 1963 साली मांडलेल्या योजनेमुळे काँग्रेसची पडझड थांबली आणि काँग्रेस पुन्हा लोकप्रिय झाली. पुढे त्यांच्याच या योजनेला कामराज योजना म्हटलं गेलं. पंडित नेहरू हे पंतप्रधान असताना 1962 साली चीनने आक्रमण केलं आणि त्यानंतर झालेल्या युद्धात भारताला पराभवाला सामोरं जावं लागलं. त्यानंतर नेहरूंच्या परराष्ट्र धोरणावर टीका होऊ लागली. त्याचदरम्यान देशातील नागरिकांवर कराचा बोजा वाढत होता, त्याचीही नाराजी होती. याचा परिणाम असा झाला की त्यानंतर झालेल्या लोकसभेच्या तीन पोटनिवडणुकीत काँग्रेसला हार पत्करावी लागली. पक्षाची होणारी ही वाताहत कशी थांबवायची याची चिंता नेहरूंना सतावत होती. त्यावेळी त्यांच्या मदतीला एक व्यक्ती धावून आला. के कामराज असं त्यांचं नाव असून ते तामिळनाडूचे मुख्यमंत्री होते.

### कामराज योजना यशस्वी

» कामराज यांनी मांडलेली ही योजना नेहरूंना पटली आणि त्यांनी त्याची अंमलबजावणी सुरू केली. मोरारजी देसाई, बिजू पटनायक, जगजीवन राम यांच्यासारख्या केंद्रीय मंत्र्यांना राजीनामा द्यायला लावला. तसेच ज्या नेत्यांचे वय जास्त आहे त्यांना मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्याचे आदेश देण्यात आले. त्यानुसार देशातील सहा ज्येष्ठ नेत्यांनी मुख्यमंत्रीपदाचे राजीनामे दिले. के कामराज यांनी मांडलेली ही योजना यशस्वी झाली. पक्षाचे ज्येष्ठ नेते संघटनेत पुन्हा सक्रिय झाल्याने पक्षाची वाताहत थांबली आणि जनतेत पुन्हा लोकप्रियता वाढीस लागली. पण कामराज यांच्या या योजनेमुळे मोरारजी देसाई यांच्यासारखे काही नेते नाराज झाले. आपल्याला मंत्रिपदावरून हटवण्यासाठी हा डाव रचला जात असल्याचं त्यांना वाटत होतं. त्यांच्या या निर्णयाने अनेक नेते नाराज झाले पण त्यामुळे पक्ष संघटना मात्र बळकट झाल्याचं दिसून येतंय.कामराज यांनी मांडलेली ही योजना नेहरूंना पटली आणि त्यांनी त्याची अंमलबजावणी सुरू केली.

# म्हणून तीन राज्यांत काँग्रेसचा पराभव

## ममता बॅनर्जी यांनी काँग्रेसला सुनावलं

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भाजपानं मध्य प्रदेशाची सत्ता राखल्याचा आणि काँग्रेसच्या हातून राजस्थान व छत्तीसगड ही महत्वाची राज्ये गेल्याचा परिणाम विरोधकांच्या 'इंडिया' आघाडीवर होण्याची शक्यता आहे. काँग्रेसनं राजस्थान, तेलंगणा, छत्तीसगड आणि मध्य प्रदेशात स्वबळावर निवडणूक लढवली आहे. 'इंडिया' आघाडीतील कुठल्याही पक्षाशी काँग्रेसनं युतीबाबत चर्चा केली नव्हती. यावरून पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी काँग्रेसला सुनावलं आहे.**



इंडिया आघाडीतील पक्षाशी जागावाटबाबत काँग्रेसनं चर्चा केली नाही. त्यामुळे तीन राज्यांमध्ये काँग्रेसचा पराभव झाला आहे. हा काँग्रेसचा पराभव आहे, जनतेचा नाही," असं ममता बॅनर्जींनी सांगितलं. तेलंगणात काँग्रेसचा विजय झाला आहे. मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थानमध्ये भाजपाचा विजय झाला असता. पण, इंडिया आघाडीतील काही पक्षांमुळे काँग्रेसच्या मतांचं विभाजन झालं. आम्ही काँग्रेसला जागावाटपाचा सल्ला दिला होता. पण, मतांच्या विभाजनामुळे काँग्रेसला पराभवाला सामोरं जावं लागलं," असं ममता बॅनर्जी म्हणाल्या. विचारधारेबरोबर एका रणनीतीची सुद्धा आवश्यकता असते. जागावाटप योग्य पद्धतीनं झालं, तर २०२४ साली भाजपा सत्तेत येणार नाही. इंडिया आघाडी पुढील वर्षी होणाऱ्या निवडणुकीपूर्वी एकत्रितरित्या मिळून काम करेल आणि चुका सुधारेल," असा विश्वास ममता बॅनर्जींनी व्यक्त केला. मिझोराममध्ये काँग्रेसने ४० जागांवर उमेदवार उभे केले होते. पण, फक्त एका उमेदवाराचा विजय झाला आहे. तेलंगणात सोडून बाकी सगळीकडे काँग्रेसचा पराभव झाला आहे," असं ममता बॅनर्जी म्हणाल्या.

### काँग्रेसला जागावाटपाचा सल्ला दिला होता

» "तेलंगणात काँग्रेसचा विजय झाला आहे. मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थानमध्ये भाजपाचा विजय झाला असता. पण, इंडिया आघाडीतील काही पक्षांमुळे काँग्रेसच्या मतांचं विभाजन झालं. आम्ही काँग्रेसला जागावाटपाचा सल्ला दिला होता. पण, मतांच्या विभाजनामुळे काँग्रेसला पराभवाला सामोरं जावं लागलं," असं ममता बॅनर्जी म्हणाल्या. विचारधारेबरोबर एका रणनीतीची सुद्धा आवश्यकता असते. जागावाटप योग्य पद्धतीनं झालं, तर २०२४ साली भाजपा सत्तेत येणार नाही. इंडिया आघाडी पुढील वर्षी होणाऱ्या निवडणुकीपूर्वी एकत्रितरित्या मिळून काम करेल आणि चुका सुधारेल," असा विश्वास ममता बॅनर्जींनी व्यक्त केला. मिझोराममध्ये काँग्रेसने ४० जागांवर उमेदवार उभे केले होते.

# रस्त्यावर मांसाहारी पदार्थ विकणारी दुकानं हटवा!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

राजस्थानमध्ये भाजपानं काँग्रेसचा धुव्वा उडवला आहे. विधानसभा निवडणुकीत भाजपाला मोठं यश मिळालं आहे. मतदानाचा निकाल समोर येऊन २४ तासंही झाले नाहीत, अशातच भाजपा आमदार ॲक्शन मोडवर आले आहेत. भाजपा आमदारानं रस्त्यावरही मांसाहारी पदार्थ विकणाऱ्या दुकानांवरून थेट अधिकाऱ्याला फोन करून तंबी दिली आहे. बालमुकुंद आचार्य असं भाजपा आमदाराचं नावं आहे. बालमुकुंद आचार्य हवामहल मतदारसंघातून निवडून आले आहेत. आचार्य यांनी सरकारी अधिकाऱ्याला फोन करून रस्त्यावर कुणीही मांसाहार पदार्थ विकू नये, असा इशारा दिला आहे. बालमुकुंद आचार्य फोन करून अधिकाऱ्याला म्हणाले, "रोडवरती मांसाहार विकू शकतो का? होय किंवा नाही बोला. तातडीने रस्त्यावरील मांसाहारी पदार्थ विकणारी सगळी दुकाने हटवून टाका. सायंकाळपर्यंत एकही दुकान दिसले नाहीत पाहिजे. याची माहिती मी तुमच्याकडून घेणार आहे. मग, कोण अधिकारी आहे, याच्याशी मला देणंघेणं नाही." जयपूरच्या हवामहल मतदारसंघातून बालमुकुंद आचार्य यांनी ६०० मतांनी निवडणूक जिंकली आहे. आचार्य यांनी काँग्रेसच्या आर.आर तिवारी यांचा पराभव केला आहे. तसेच, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बालमुकुंद आचार्य यांचा प्रचार केला होता. बालमुकुंद आचार्य यांनीच एकनाथ शिंदेंचा बॅनरवर 'हिंदू हृदयसम्राट' उल्लेख केला होता. राजस्थानमध्ये भाजपानं काँग्रेसचा धुव्वा उडवला आहे. विधानसभा निवडणुकीत भाजपाला मोठं यश मिळालं आहे. मतदानाचा निकाल समोर येऊन २४ तासंही झाले नाहीत, अशातच भाजपा आमदार ॲक्शन मोडवर आले आहेत.

# आनंदाला वयाचं बंधन नाही!

जुनी गाणी म्हटलं आजही प्रेक्षकांच्या लक्षात राहणारी आणि तितकीच लोकप्रिय. आजही जुनी गाणी रसिकांच्या ओठावर असतात. त्यातच 70 च्या दशकातील गाण्यामध्ये एक वेगळेपणा होता. एक गोडवा होता. त्यामुळे आजही त्या काळातील गाणी लोकांमध्ये खूप लोकप्रिय आहेत. असचं त्या काळातील एक प्रसिद्ध गाणं म्हणजे 'कोई शहरी बाबू दिल लहरी बाबू'. आजही हे गाणं अनेकांना तोंड पाठ असेल. बॉलिवूडमधील ज्येष्ठ अभिनेक्षी मुमताज (MUMTAZ) आणि ज्येष्ठ गायिका आशा भोसले (ASHA BHOSLE) यांच्या डान्सचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये मुमताज आणि आशा भोसले या दोघी "कोई सहरी बाबू दिल लहरी बाबू" (गाण्यावर थिरकताना दिसत आहेत. दोघींच्या या व्हिडीओ नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे. मुमताज यांनी त्यांच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरुन एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये त्या आशा भोसले यांच्यासोबत "कोई सहरी बाबू दिल लहरी बाबू" या गाण्यावर डान्स करताना दिसत आहेत. व्हिडीओमध्ये मुमताज या आशा भोसले यांना डान्स स्टेप्स सांगताना दिसत आहेत. मुमताज यांनी शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये त्या बॅक आऊटफिटमध्ये दिसत आहेत. "कोई सहरी बाबू दिल लहरी बाबू" हे गाणे लोफर या चित्रपटामधील आहे. हे गाणे लक्ष्मीकांत- प्यारेलाल या जोडीने लिहिले आहे आणि आशा भोसले यांनी हे गायले आहे. आजही लोक हे गाण आवडीनं ऐकतात. भीमसिंह दिग्दर्शित लोफर हा चित्रपट 1973 मध्ये रिलीज झाला होता. धर्मेंद्र आणि मुमताज या चित्रपटात मुख्य भूमिकेत होते तर ओम प्रकाश, प्रेमनाथ आणि के एन सिंग यांनी देखील या चित्रपटात काम केलं होतं. "कोई सहरी बाबू दिल लहरी बाबू" या गाण्यासोबतच आज मौसम बड़ा बे-ईमान है, मैं तेरे इश्क़ में,मोतियों की लड़ी हूँ मैं या लोफर चित्रपटांमधील गाण्यांना प्रेक्षकांची पसंती मिळाली होती.

# त्रिशानं रणबीरच्या 'ॲनिमल'चं केलं कौतुक

साऊथचा प्रसिद्ध दिग्दर्शक संदीप रेड्डीचा ॲनिमल प्रदर्शित झाला आणि वेगळ्याच चर्चेला उधाण आल्याचे दिसून आले आहे. बॉक्स ऑफिसवर या चित्रपटानं मोठी कमाई केली आहे. अशातच काही सेलिब्रेटींनी रणबीरच्या या चित्रपटाचं केलेलं कौतुक अनेकांच्या चर्चेचा अन् टीकेचा विषय असल्याचे दिसून आले आहे. काही दिवसांपूर्वी प्रसिद्ध अभिनेत्री त्रिशा कृष्णन ही लिओ चित्रपटामुळे चर्चेत आली होती. त्यानंतर त्याच चित्रपटातील एका मन्सूर अली खान नावाच्या अभिनेत्यानं तिच्यावर आक्षेपार्ह शब्दांत पोस्ट केल्यानं त्याच्याविरोधात कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी त्रिशानं केली होती. तिच्या या मागणीला प्रसिद्ध अभिनेता चिरंजीवी यांनी देखील पाठींबा दिला होता. आता त्रिशा ही पुन्हा एकदा चर्चेत आली आहे ते तिनं ॲनिमलचं कौतुक केल्यामुळे. ि त नं इंस्टावर केलेली पोस्ट नेटकऱ्यांच्या संतप्त प्रतिक्रियेचा विषय झाला आहे. त्रिशानं ॲनिमलचं समर्थन करावं हे अनेकांना आवडलेलं नाही. तिनं म्हटलं आहे की, कल्ट...पापा....अशा शब्दांत त्रिशानं आपली प्रतिक्रिया दिली होती. त्यानंतर मात्र तिच्यावर नेटकऱ्यांनी जी आगपाखड केली त्यामुळे तिला ती पोस्ट डिलिट करावी लागली आहे. रणबीरच्या त्या चित्रपटानं प्रेक्षकांची जेवढी पसंती मिळवली आहे तेवढ्याच प्रमाणात तो ट्रोलही झाला आहे. त्यातील हिंसा, त्याचे केले जाणारे समर्थन, काही प्रसंग यामुळे नेटकऱ्यांनी रणबीरला ट्रोल केले आहे. दिग्दर्शकाला त्या चित्रपटातून काय सांगायचे आहे हेच कळलं नाही. अशा शब्दांत नेटकऱ्यांनी रणबीरवर आगपाखड केली आहे.

# जान्हवी शिखरला करतीये डेट?

बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री जान्हवी कपूर (JANHVI KAPOOR) ही तिच्या चित्रपटांमुळे चर्चेत असते. नुकतीच जान्हवी ही महाकाल देवाच्या दर्शनासाठी उज्जैनच्या महाकालेश्वर मंदिरात गेली होती. महाकालेश्वर मंदिरातील जान्हवीचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. ज्यामध्ये ते भजन म्हणताना दिसत आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या महाकालेश्वर मंदिरातील व्हिडीओमध्ये दिसत आहे की, जान्हवी कपूर ही सुशील कुमार शिंदे यांचा नातू शिखर पहाडियासोबत महाकाल देवाच्या भक्तीत तल्लीन झालेली दिसत आहे. जान्हवी आणि शिखर यांच्यासोबतच दिग्दर्शक ॲटलीनं देखील महाकाल देवाचे दर्शन घेतले आहे. काही दिवसांपूर्वी जान्हवी आणि शिखरने तिरुपती बालाजीचे दर्शनही घेतले होते. शिखर पहाडिया हा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री सुशील कुमार शिंदे यांचा नातू आहे. शिखर हा स्मृती शिंदे आणि संजय पहाडिया यांचा मुलगा आहे. जान्हवीचं नाव गेल्या काही दिवसांपासून शिखरसोबत जोडलं जात आहे. शिखर आणि जान्हवी यांनी त्यांच्या चाहत्यांना त्यांच्या नात्याबाबत अजून कोणतीही माहिती दिलेली नाही. पण विविध कार्यक्रमांमध्ये शिखर आणि जान्हवी यांना एकत्र स्पॉट केलं जातं. त्यामुळे जान्हवी आणि शिखर यांच्या नात्याबाबत सोशल मीडियावर चर्चा होत असते. गुंजन सक्सेना, घोस्ट स्टोरीज, दोस्ताना 2, रूही यांसारख्या हिट चित्रपटांमध्ये जान्हवीनं काम केलं आहे. मिली या चित्रपटातील अभिनयाचं अनेकांनी कौतुक केलं. जान्हवीच्या आगामी चित्रपटांची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत असतात. ती लवकरच ज्युनियर एनटीआरसोबत 'देवारा' या चित्रपटात दिसणार आहे.



# फायटर' मधील हृतिक रोशनचा लूक आऊट!

अभिनेता हृतिक रोशन (HRITHIK ROSHAN), आणि अभिनेत्री दीपिका पादुकोणचा (DEEPIKA PADUKONE) 'फायटर' (FIGHTER) हा चित्रपट बऱ्याच दिवसांपासून चर्चेत आहे. या चित्रपटाबद्दल चाहत्यांना प्रचंड उत्सुकता आहे. आता या चित्रपटामधील हृतिकचा लूक रिलीज करण्यात आला आहे. 'फायटर' या चित्रपटातील हृतिक रोशनचा फर्स्ट लूक रिलीज करण्यात आला आहे. त्याच्या या लूकनं अनेकांचे लक्ष वेधले आहे. हृतिक रोशननं सोशल मीडियावर त्याच्या फायटर या चित्रपटामधील लूकचा फोटो सोशल मीडियावर शेअर केला आहे. हा फोटो शेअर करुन त्यानं चित्रपटामधील त्याच्या भूमिकेची माहिती दिली आहे. 'फायटर' या चित्रपटामध्ये हृतिक हा स्क्वाड्रन लीडर समशेर पठानिया ही भूमिका साकारणार आहे. हृतिकनं त्याच्या फायटर या चित्रपटामधील लूकचा फोटो शेअर करुन कॅप्शनमध्ये लिहिलं, "स्क्वाड्रन लीडर समशेर पठानिया, कॉल साइन-पॅटी, डेजिग्नेशन: स्क्वाड्रन, पायलट, यूनिट: एयर ड्रॅगन्स, फाइटर फॉरएवर" फायटर या चित्रपटाच्या माध्यमातून हृतिक रोशन आणि दीपिका पदुकोण हे पहिल्यांदाच स्क्रिन शेअर करणार आहेत. त्यांची जोडी पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक आहेत. सिद्धार्थ आनंद दिग्दर्शित या चित्रपटात अनिल कपूर यांनी देखील महत्वाची भूमिका साकारली आहे. सिद्धार्थचा हृतिकसोबतचा हा तिसरा चित्रपट असणार आहे. याआधी दोघांनी 'वॉर', 'बँग बँग' या चित्रपटांसाठी एकत्र काम केले आहे. फाइटर' हा चित्रपट पुढच्या वर्षी 25 जानेवारी 2024 रोजी थिएटरमध्ये दाखल होणार आहे. काही दिवसांपूर्वी फायटर या चित्रपटाचे मोशन पोस्टर रिलीज करण्यात आलं होतं. या मोशन पोस्टरमध्ये अनिल कपूर, हृतिक आणि दीपिका यांचा डॅशिंग लूक बघायला मिळाला. प्रेक्षक या चित्रपटाची उत्सुकतेने वाट बघत आहेत.



# निया शर्माच्या समोर तर उर्फी पण फेल

उर्फी जावेद ही तिच्या अतरंगी फॅशनमुळे नेहमी चर्चेत असते. उर्फीचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत असतात. अशातच आता आणखी एका अभिनेत्रीच्या हटके आऊटफिटची चर्चा सोशल मीडियावर होत आहे. या अभिनेत्रीचे हटके लूकमधील फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. जाणून घेऊयात या अभिनेत्रीबद्दल... अभिनेत्री निया शर्मानं खास लूकमध्ये एका बर्थडे पार्टीला हजेरी लावली. नियाच्या या लूकची चर्चा सोशल मीडियावर होत आहे. नियाचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. ज्यामध्ये ती ब्लॅक आऊटफिट, हातात ब्लॅक बॅग आणि मोकळे केस अशा लूकमध्ये दिसत आहे. तिच्या या लूकनं अनेकांचे लक्ष वेधले आहे. निया शर्माच्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या फोटो आणि व्हिडीओवर अनेक नेटकऱ्यांनी कमेंट्स केल्या आहेत. एका नेटकऱ्यानं कमेंट केली, "हिच्या समोर तर उर्फी पण फेल" तर दुसऱ्या युझरनं कमेंट केली, "असाच ट्रेलर उर्फीनं घातला होता, तेव्हा तिला अनेकांनी ट्रोल केलं होतं." निया शर्मा अनेक मालिकांमध्ये काम केलं आहे. निया शर्मानं 'काली- एक अग्निपरीक्षा' या 2010 मधील मालिकेमधून अभिनय क्षेत्रात पदार्पण केलं. 'जमाई राजा' या मालिकेमुळे तिला विशेष लोकप्रियता मिळाली.'खतरों के खिलाडी' आणि 'झलक दिखला जा' या कार्यक्रमांमध्ये देखील तिनं सहभाग घेतला होता. निया ही सोशल मीडियावर विविध लूकमधील फोटो शेअर करत असते. तिच्या सोशल मीडियावरील फोटो आणि व्हिडीओवर नेटकरी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव करत असतात. निया शर्माला इन्स्टाग्रामवर 7.7 मिलियन फॉलोवर्स आहेत.



# खराब कामगिरीचा बावुमाला फटका!

## भारताविरुद्धच्या मालिकेसाठी आफ्रिकन संघ जाहीर

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारताविरुद्धच्या टी-२०, एकदिवसीय आणि कसोटी मालिकेसाठी दक्षिण आफ्रिकेच्या संघाची घोषणा करण्यात आली आहे. एडन मार्करामला टी-२० आणि वन डे फॉरमॅटमध्ये कर्णधार बनवण्यात आले आहे. विश्वचषकातील खराब कामगिरीचा टेम्बा बावुमाला फटका बसला आहे, आता तो कसोटीत फक्त कर्णधार दिसणार आहे. नुकत्याच झालेल्या एकदिवसीय मालिकेत बावुमाने दक्षिण आफ्रिकेच्या संघाचे नेतृत्व केले. मात्र, आता त्याच्याकडून केवळ कर्णधारपदच काढून घेतले जात नाही तर त्याला संघातूनही वगळण्यात आले आहे. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील मालिकेला १० डिसेंबरपासून सुरूवात होत आहे.**







आधी टी-२० मालिका, नंतर एकदिवसीय आणि शेवटी कसोटी मालिका खेळवली जाईल. ऑटोनिएल बार्टमॅन, मॅथ्यू ब्रिस्क, नांद्रे बर्जर हे टी-२०चे नवे चेहरे आहेत. त्याच वेळी, ऑटोनिएल बार्टमन आणि नांद्रे बर्जर व्यतिरिक्त, टोनी डी जॉर्जी, मिहलाली पोंगवाना हे वन डेमध्ये नवीन चेहरे असतील. क्विंटन डी कॉकने आता आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. अशा स्थितीत कसोटीत विकेट्स घेणाऱ्या काईल वॉर्नरवर जबाबदारी सोपवण्यात आली आहे. डेव्हिड बेडिंगहॅम, नांद्रे बर्जर, टोनी डी जॉर्जी, कीगन पीटरसन हे कसोटीतील नवे चेहरे आहेत. त्याचबरोबर टी-२० स्पेशालिस्ट मानल्या जाणाऱ्या ट्रिस्टन स्टब्सलाही कसोटीत संधी देण्यात आली आहे. ज्युनियर एबी डिव्हिलियर्स म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डेवाल्ड ब्रेव्हिसला भारताविरुद्धच्या मालिकेत संधी देण्यात आलेली नाही. एकदिवसीय कर्णधार टेम्बा बावुमा व्यतिरिक्त, कागिसो रबाडा देखील कसोटी आणि झटपट स्वरूपाच्या क्रिकेट मधून वगळले आहे. हे दोघेही कसोटी मालिकेत पुनरागमन करतील. दुसरीकडे, रॅसी व्हॅन डर डुसेनचा केवळ एकदिवसीय मालिकेसाठी संघात समावेश करण्यात आला आहे. त्याला कसोटी आणि टी-२० मधून वगळण्यात आले आहे. डुसेन गेल्या काही काळापासून फारसा फॉर्ममध्ये नाही. अशा स्थितीत दक्षिण आफ्रिकेच्या निवड समितीने नव्या खेळाडूंवर विश्वास व्यक्त केला आहे.

**आफ्रिकेचा टी-२० संघ:** एडन मार्कराम (कर्णधार), ऑटोनिएल बार्टमन, मॅथ्यू ब्रिस्क, नांद्रे बर्जर, गेराल्ड कोएत्झी, डोनोव्हन फरेरा, गेराल्ड कोएत्झी, डोनोव्हन फरेरा, रीझा हेंड्रिक्स, मार्को जॅन्सन, हेन्रिक क्लासेन, केशव महाराज, डेव्हिड मिलर, लुंगी एनगिडी, अँडिले फेहलुकवायो, तबरेझ शम्सी, ट्रिस्टिन स्टब्स, लिझाड विल्यम्स.

**आफ्रिकेचा एकदिवसीय संघ:** मार्कराम (कर्णधार), ऑटोनिएल बार्टमन, नांद्रे बर्जर, टोनी डी जोर्गी, रीझा हेंड्रिक्स, हेनरिक क्लासेन, केशव महाराज, मिहलाली पोंगवाना, डेव्हिड मिलर, विआन मुल्डर, अँडिल फेहलकुवायो, तबरेझ शम्सी, रॅसी व्हॅन डर लिस्सेन, ड्युसेन, रॅसी.

### डुसेन कसोटी संघातून बाहेर

» एकदिवसीय कर्णधार टेम्बा बावुमा व्यतिरिक्त, कागिसो रबाडा देखील कसोटी आणि झटपट स्वरूपाच्या क्रिकेट मधून वगळले आहे. हे दोघेही कसोटी मालिकेत पुनरागमन करतील. दुसरीकडे, रॅसी व्हॅन डर डुसेनचा केवळ एकदिवसीय मालिकेसाठी संघात समावेश करण्यात आला आहे. त्याला कसोटी आणि टी-२० मधून वगळण्यात आले आहे. डुसेन गेल्या काही काळापासून फारसा फॉर्ममध्ये नाही. अशा स्थितीत दक्षिण आफ्रिकेच्या निवड समितीने नव्या खेळाडूंवर विश्वास व्यक्त केला आहे.

# नीरज चोप्राने बुमराहला दिला महत्त्वाचा सल्ला

## नीरजने बुमराहला त्याचा आवडता गोलंदाज म्हणून वर्णन

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**सध्याचा ऑलिम्पिक चॅम्पियन नीरज चोप्राने त्याचा आवडता वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहला अधिक वेग कसा वाढवता येईल याचा सल्ला दिला आहे. एकदिवसीय विश्वचषक फायनल पाहण्यासाठी नरेंद्र मोदी क्रिकेट स्टेडियमवर उपस्थित होता. नीरजने बुमराहला त्याचा आवडता वेगवान गोलंदाज म्हणून वर्णन केले आहे. त्याच्या गोलंदाजीच्या शैलीचे कौतुक केले आहे. विशेश म्हणजे चेक प्रजासत्ताकचा विश्वविक्रम धारक जॉन झेलेझनी आणि नॉर्वेचा आंद्रियास थॉर्किलडसेन यांच्यानंतर ऑलिम्पिक आणि जागतिक विजेतेपद दोन्ही जिंकणारा नीरज चोप्रा इतिहासातील फक्त तिसरा भालाफेकपटू आहे.**







जसप्रीत बुमराहने विश्वचषकात चमकदार कामगिरी करत २० विकेट घेतल्या होत्या. तथापि, चोप्राला वाटते की एक छोटासा बदल त्याचा आवडता वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहचा वेग वाढवण्यास मदत करेल. तो इंडियन एक्सप्रेसच्या आयडिया एक्सचेंज या कार्यक्रमात म्हणाला, “जसप्रीत बुमराहची गोलंदाजी करण्याची शैली आवडते. मला वाटतं त्याचा वेग आणखी वाढवण्यासाठी त्याने रनअप वाढवले पाहिजे. भालाफेकपटू या नात्याने आम्ही अनेकदा चर्चा करतो की, गोलंदाजाने थोडेसे मागून रन-अप सुरू केल्यास त्याचा वेग वाढेल. जसप्रीत बुमराहची गणना जगातील महान वेगवान गोलंदाजांमध्ये केली जाते. त्याच्याकडे ताशी १४० किलोमीटरपेक्षा जास्त वेगाने गोलंदाजी करण्याची क्षमता आहे. त्याची ॲक्शन अगदी वेगळी आहे. वेग निर्माण करण्यासाठी तो त्याच्या कंबरेवर खूप जोर देतो. त्याची ही ॲक्शन धोकादायक आहेच, पण त्यामुळे त्याला दुखापत होण्याचाही धोका आहे. पाठीच्या दुखापतीमुळे तो जवळपास वर्षभर मैदानापासून दूर राहीला होता. त्याने ऑगस्टमध्ये आयर्लंड मालिकेदरम्यान पुनरागमन केले आणि तो त्याच्या जुन्या रंगात परतला. दुखापतीनंतरही त्याने आपल्या ॲक्शनमध्ये बदल केला नाही. त्याचा वेगही कमी झाला नाही. पुनरागमनानंतर तो अधिक धारदार दिसत आहे. २०२३ च्या विश्वचषकातील त्याची कामगिरी हे त्याचे उदाहरण आहे. बुमराहची दक्षिण आफ्रिका दौऱ्यावरील दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी निवड करण्यात आली आहे. एकदिवसीय आणि टी-२० मालिकेत तो संघाचा भाग असणार नाही. विश्वचषक फायनलमध्ये उपस्थित राहण्याचा एक चाहता म्हणून त्याच्या अनुभवाबद्दल नीरज चोप्रा म्हणाला, “मी पहिल्यांदाच पूर्ण सामना पाहिला. भारताने जेव्हा तीन विकेट गमावल्या होत्या, तेव्हा मी आलो होतो. त्यावेळी विराट भाई आणि केएल राहुल फलंदाजी करत होते. काही तांत्रिक गोष्टी असू शकतात ज्या मला समजत नाहीत. दिवसा फलंदाजी करणे सोपे नव्हते. त्या दिवशी संध्याकाळी फलंदाजी करणे सोपे झाले, असे मला वाटते. पण आपल्या संघाच्या खेळाडूंनी पूर्ण प्रयत्न केले. कधीकधी, तो आपला दिवस नसतो. पण, खरे सांगायचे, तर स्पर्धा खूप छान होती.

### वर्ल्डकपचा अनुभवही शेअर केला

» जसप्रीत बुमराहची गणना जगातील महान वेगवान गोलंदाजांमध्ये केली जाते. त्याच्याकडे ताशी १४० किलोमीटरपेक्षा जास्त वेगाने गोलंदाजी करण्याची क्षमता आहे. त्याची ॲक्शन अगदी वेगळी आहे. वेग निर्माण करण्यासाठी तो त्याच्या कंबरेवर खूप जोर देतो. त्याची ही ॲक्शन धोकादायक आहेच, पण त्यामुळे त्याला दुखापत होण्याचाही धोका आहे. पाठीच्या दुखापतीमुळे तो जवळपास वर्षभर मैदानापासून दूर राहीला होता. दिवसा फलंदाजी करणे सोपे नव्हते. त्या दिवशी संध्याकाळी फलंदाजी करणे सोपे झाले, असे मला वाटते.